# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय: महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई - ४००००८.

दूरध्वनी क्र. २३०२३९०० ई-मेल- posbmsrtc@rediffmail.com

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई येथे जनसंपर्क अधिकारी या पदावर निव्वळ कंत्राटी पद्धतीने ठोक मासिक मोबदल्यावर सेवानिवृत्त अधिकाऱ्यांमधून नेमणूक करण्यासाठी खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून अर्ज मागविण्यात येत आहे.

**शैक्षणिक अर्हता:** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी असणे आवश्यक.
मान्यताप्राप्त विद्यापीठाची / संस्थेची पत्रकारितेतील पदविका असल्यास प्राधान्य दिले जाईल. तसेच संगणक प्रणालीचे ज्ञान तसेच समाज माध्यमे हाताळण्यातील प्रावीण्य आवश्यक (सुधारित)

**अनुभव:** सेवानिवृत्त जनसंपर्क अधिकारी (PRO), या पदावरील शासकीय / निमशासकीय सेवेतील किमान १० वर्षे किंवा त्यावरील अनुभव असणे आवश्यक अथवा पत्रकारितेचा किमान २० वर्षांचा अनुभव.
शैक्षणिक अर्हता व अनुभवाचे दाखले अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**वयोमर्यादा:** कमाल ६५ वर्षे

**मानधन:** शासन निर्णय सा.प्र. वि. क्रमांक संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७ डिसेंबर, २०१६ व संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि. २१.०२.२०१८ नुसार निश्चित केलेले मासिक पारिश्रमिक व भत्ते अनुज्ञेय राहील.

**कराराचा कालावधी:** प्रथम १ वर्ष, पुढील मुदतवाढ काम समाधानकारक असल्यास व आवश्यकतेनुसार २ वर्षांपर्यंत वाढविण्यात येईल.

**अर्ज स्वीकारण्याची शेवटची तारीख:** ०३.१०.२०२०

**टीप:** सदर पद हे करार पद्धतीने १ वर्ष मुदतीसाठी भरण्यात येणार असल्याने शासन निर्णयानुसार शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या अर्जाचा विचार होईल याची नोंद घ्यावी.

**पत्रव्यवहारासाठी पत्ता:** महाव्यवस्थापक (क. व औ. सं.)
म. रा. मा. प. महामंडळ, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मध्यवर्ती कार्यालय,
मुंबई- ४००००८.